RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Associate Professor &Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 2000/-



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | भळभळत्या जखमांचा हुदुंका- लतिका चौधरी यांची कादंबरी | प्रा. डॉ. शिशकांत पाटील | 88 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय कृषिविषयक विचार व कार्य | प्रा. डॉ. बोकारे तुकाराम एक्नाथराव | 92 |
| 23 | विज्ञापन और हिंदी भाषा | प्रा. पठाण जयनुल्लाखान | 95 |
| 24 | उषा प्रियंवदा के उपन्यासों में सामाजिक चेतना | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 98 |
| 25 | स्त्रियांच्या उध्दारासाठी महापुरुषांचे योगदान | प्रा. मोहन सौंदय | 101 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | डॉ. प्रल्हाद होंडे | 103 |
| 27 | ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरुप | प्रा. डॉ. लक्ष्मण गिते | 106 |
| 28 | संत साहित्यातील सामाजिक समतेचा वैश्विक उद्घोष | प्रा. डॉ. सदाशिव सरकटे | 109 |
| 29 | दलित कविता आणि विद्रोह | प्रा. डॉ. लक्ष्मण गिते | 112 |
| 30 | हिंदी उपन्यासों में चित्रित नारी का मनोवैज्ञानिक विश्लेषण | गायकवाड संजय सिताराम | 114 |
| 31 | "आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज" | बनकर अश्विनी भास्करराव | 117 |
| 32 | महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या कमी पटाच्या शाळांच्या स्थलांतरणाचा विद्यार्थ्यां वरील परिणामाचा चिकित्सक अभ्यचास | श्री. पवार संदीप रावसाहेब | 122 |
| 33 | त्रिसुत्री JAM योजना आणि आदिवासी समाज | प्रा. विश्वजीत नरवाडे,<br>डॉ. जे.एम. अवथरे | 127 |
| 34 | महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या विकासामधील समाज सहभागाचे अध्ययन | श्री. पवार संदीप रावसाहेब | 133 |
| 35 | औरंगाबाद जिल्ह्यातील आदिवासींच्या आर्थिक जीवनावर नुक्लिडस योजनेचा झालेला परिणाम एक अभ्यास | प्रा. विश्वजीत नरवाडे,<br>डॉ. जे.एम. अवथरे | 138 |



Scanned with CamScanner

# संत साहित्यातील सामाजिक समतेचा वैश्विक उद्घोष

**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे**
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर (गढी)

आपला भारतीय समाज सांस्कृतिकदृष्ट्या सुजलाम सुफलाम आहे. भारतीय कुटुंबाच्या पिढ्यान्‌पिढ्या आदर्श व अभिजातवादाचा उपासक आहे. जे जे भव्य, उथत्त, मंगलमय, पवित्र ते ते आपल्या समाजमनाला आकर्षित करते. देशप्रेम, समाजप्रेम, समाजहित, समाजप्रबोधन या संकल्पना समाजमानवाला साद घालतात आणि बहुसंख्येने या सादाला प्रतिसाद मिळतो हा आपला इतिहास आहे. दया, क्षमा, शांती, प्रेम, निःस्वार्थपणा, त्याग, बलिदान इत्यादी नैतिक मूल्यांची जन्मजातच देणगी असलेले अनेक महामानव हे आपल्या भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. मराठी संतपरंपरा हे महाराष्ट्राचे भूषण आहे. याच संतसाहित्याने सामाजिक समतेचा संदेश जनमानसात पोहचविण्याची मोलाची कामगिरी केलेली आहे. म्हणूनच युनेस्को या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक संघटनेने वारकऱ्यांना शिरोधार्थ असणारी तुकोबाची गाथा व ज्ञानेश्वरी इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच भाषेमध्ये भाषांतर करून जगभर पोचवली. संताचे वैचारिक सौंदर्य समाजाला मानसिक बळ आजही देत आहे. समाजोद्धारासाठी वाटही दाखवित आहे. लोकसमृद्धी, विश्वशांती, विश्वकल्याण साध्य करणे हेच संतसाहित्याचे ध्येय असते. संताची अक्षर ही 'अक्षच्च'असतात. समाजप्रबोधनाचे समृद्ध भांडार असणारे संत साहित्य हे संस्कारक्षमता मानवता आणि सार्वकालिकता ह्या ठळक वैशिष्ट्यामुळे संतवाङ्.मय हे व्यापक, विविधांगी, सर्वसमावेश बनले. वारकऱ्यांचा प्राण असलेला तुकोबा स्वतःच्या अभंगवाणीने अमर झालेला आहे. वारकरी संप्रदायाची ध्वजा गेली सातशे वर्षे उत्तुंगपणे फडकत आहे. मध्ययुगीन भारतातील भक्तिमार्गी संतांची चळवळ ही सामाजिक, समाजमानसशास्त्रीय आणि सांस्कृतिक दृष्टीकोणातून पुनःपुन्हा चिंतनाला प्रवृत्त करणारी घटना आहे. इसवीसनाच्या सुमारे बाराव्या शतकापासून कमी अधिक सतराव्या शतकाअखेरपर्यंतचा कालखंड भारतभराच्या साहित्य इतिहासात संतसाहित्याचा कालखंड आहे. इ.स. दहाव्या शतकानंतर भारतातील आधुनिक भाषा लिपीबद्ध झाल्या त्यांचा पहिला अविष्कार हा भक्तिकाव्याचा आहे.

साहित्य हे त्या समाजमनाची प्रकृती तपासण्याचे एक महत्त्वाचे साधन असते. 'आम्हा घरी धन शब्दाचे' सांगणारे तुकोबाराय, 'मराठीचे बोल कौतुके' सांगणारे नामदेव, 'मन चंगा तो कटौती में गंगा' सांगणारे संत रवीदास, 'कांदा मुळा भाजी अवघी विनई माझी' सांगणारा सातवा माळी, 'दशःसुत्री सांगणारे गाडगेबाबा, सेनाS न्हावी, चोखामेळा, ग्रामगीता सांगणारे तुकडोजी महाराज, गोरा कुंभार, संत सेना महाराज, संत सज्जन कसाई, जनाई, विठाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई, संतसखु, गोदामाई, कान्होपात्रा, अक्कमहादेवी. ह्या संताच्या मांदीयाळीची सामाजिक संवेदनशीलता, वैश्विक दृष्टीकोन, मानवकेंद्री विज्ञाननिष्ठ विचार हा आजही तितकाच दिशादर्शक आहे. म्हणूनच प्रबोधन व सामाजिक परिवर्तनाच्या अंगाने तो विचार समजून घेणे आजही अत्यंत आवश्यक वाटते.

भारताचा सामाजिक व राजकीय इतिहास पाहिला असता अंधाराला भेदण्याचे काम संतविचारांनी केलं. उघड्या डोळ्यांनी वर्तमान पाहिला. माणसाला माणसाचे भय वाटू लागले तेव्हा हातात लेखनी तर डोक्यात विचार घेऊन समाजाला सरळ करण्यासाठी तर कधी प्रेमाने समजवण्यासाठी संतवाणी बोलू लागली. "भले तरी देऊ कासेची लंगोटी। नागळांच्या मायी हाणी काठी" असे अधिकाराने सांगत वारकरी वृत्ती जोपासली. माणसामध्ये देवत्त्व शोधलं.

।।जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले
तो चि साधु ओळखावा। देव तेथे चि जाणावा।।



Scanned with CamScanner

जो सर्व प्राणीमात्राच्या कल्याणाची काळजी वाहतो तीचा संत या नावाला साजेसा असतो. संतानी साधन विहीन, उपेक्षित आणि म्हणूनच अगतिक होऊ पाहणाऱ्या समाजाला अस्मिता दिली. त्यांची अंतःशक्ती जागी केली. भोवतालचे भौतिक जीवन बदलणे शक्य नाही तर आपले आंतरिक जीवन आपण बदलू शकतो हा विश्वास दिला. मुख्य म्हणजे भौतिक जीवन म्हणजे सर्वस्व नव्हे याचे भान आणून दिले. शेवटी भौतिक सत्ता-संपत्ती मर्यादित आहे, माणसाचे माणूसपण त्याही पलीकडचे आहे याचे भान जागे केले. त्यातून येणारी निर्भयता हे खरे बळ असते ते दिले. हे भान घेऊन जो कुणी देव शोधायला जातो त्याला मग असा प्रत्यय येतो की देव दुसरीकडे कोठे नाही तो माझ्यातच आहे. संत ही अनुभूती अत्यंत सुगमपणे व्यक्त करतात.

।।देव माझा मी देवाचा।
हीच माझी सत्य वाचा
देव पाहावया गेलो
तेथे देवाचे होऊनि गेलो।।

देहपातळीवरच्या अस्तित्वाच्या अविद्येतून मुक्त झाल्याखेरीज खरे आत्मसामर्थ्य येत नाही. देव कर्मकांडात नाही. तुमचे 'भावबळ' जागे करा. कोणत्याही धनदौलतीची यज्ञयागाची, मंत्रातंत्राची गरज नाही. तुमचे सामाजिक स्थान कोणतेही असो सत्य सांगण्याचे काम तुकारामांनी केले. 'अर्थे लोपली पुराने। नाश केला शब्द ज्ञाने ' किंवा 'अर्थेविण पाठांतर कासया करावे व्यर्थचि मरावे घोकुनिया'। असेही ठणकावून सांगतात. बुद्धीप्रामाण्यवादी, पुरोगामा विचारामध्ये ४०० वर्षापूर्वीची तळमळ आजही जाणवते. ज्यावेळेस माणूस प्रयत्नवादापेक्षा दैववादाला बळी पडत होता. एकीकडे हिंसा, छळ, अत्याचाराची भयानकता तर दूसरीकडे परोपकारी, सदाचारी संताची शिकवण अशावेळेस वेदशास्त्राला नाकारून चिकित्सा करावी असे अभ्यासपूर्ण वक्तृव्य तुकोबांनी केले. ।'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा
येरांनी वहावा भार माथा।।'

असे सांगत लोकचेतनेची क्रांतीकारी भावना अभंगातून सामर्थ्याने मांडली. जीवनाची वास्तविकता पाहिली, अनुभवली त्यानंतर सामाजिक विसंगतीवर भेदभाव न करता बोट ठेवले. संत कबीरांनी शोषित, दलित, पीडितांमध्ये सन्मानाची भावना जागृत केली.

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये संतसाहित्याचे योगदान मोलाचे आहे. यात वारकरी संप्रथयांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. झोपलेल्यांना जागे करणे, जागे असणाऱ्यांना चालवणे, चालणाऱ्यास गतिमान करणे गतिमान असणाऱ्यांच्या हाती समाजपरिवर्तनाची सूत्रे देणे म्हणजे वारकरी धर्म. वारकरी ही चिंतनशील जाणीव आहे. मोठ्या मनाने विश्व अनुभवावे, आपण सर्व एक आहोत ही जाणीव ठेवावी, सर्वधर्म-समभाव जोपासावा. समता, सदाचाराची शिकवण अंगीकारावी ह्यासाठी संतविचार आजही काळाची गरज ठरत आहेत. वारकरी संताचे विचार हे धर्म, जात, पंथ या पलीकडे नेणारे आहेत. स्वार्थ, संकुचित वृत्तीला तिलांजली देऊन मानवतेचे उन्नयन यातून पुढे आले आहे.

आज आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत आहोत. आपली भौतिक प्रगती झाली मात्र मानवीमूल्ये पायदळी तूडविल्या जात आहेत. जातीधर्माची तेढ निर्माण होत आहे. स्वार्थापोटी खून, दरोडे, बलात्कार, भ्रष्टाचार होत आहे. क्षुल्लक कारणांवरून रक्तपात, सामुहिक कत्तल होत आहे. अशा बेबंदशाहीच्या वातावरणामध्ये संपूर्ण विश्वातील लोकांचे मने जोडून खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा आनंद 'वसुधैव कुटूंबकम्' ह्या भावनेतून 'आनंथचे डोही आनंद तरंग' हा सांगण्याचा प्रयत्न आजही होत आहे. लाखोच्या संख्यानी टाळमृदुंगाच्या गजरात, नादब्रम्हाच्या सूरात अत्यंत शुद्ध भावनेने, आपण सर्व निसर्गाचे घटक आहोत, एकात कुटुंबातील आहोत ह्या वृत्तीने सामाजिक- सांस्कृतिक समतेचा संदेश सर्व धर्मांच्या लोकांना सोबत घेऊन विश्वधर्म, मानवधर्म जोपासण्यासाठी समताधिष्टित समाजनिर्मितीचे बीज वारकरी संतांनी मांडले. सर्व चांगुलपणाच्या



Scanned with CamScanner

सर्व सृजनतेचा आणि सर्व मंगलदायी विचारांच्या मागे असलेला समतेचा विचार जनमाणसात रुजवला.

।। जे जे भेटी भूत। तया सी मानिजे भगवंत।। ही भावना रुजवून जगतगुरू तुकोबांनी

।।असाध्य ते साध्य करीता सायास कारण अभ्यास

तुका म्हणे।।

हे सहज सोप्या भाषेत सांगितले.

आज स्पर्धेच्या, विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या युगात आपण वावरत आहोत. आज ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. चमत्कार वाटावेत असे विज्ञानाचे अविष्कार आपण रोज अनुभवत आहोत. निसर्गावर मात करण्याची उर्मी एकीकडे हे सर्व होत असतांना दुसरीकडे आपला धर्मवेडेपणा कमी होत नाही. धर्माच्या, जातीच्या नावावर दंगली होतात. माणसांना जिवंत जाळले जाते. स्त्रिया आणि मुले ह्यांच्या हत्या होतात. तरुणांना धर्माच्या नावावर एक करून त्यांना दुसऱ्या धर्माच्या विरोधात भडकावले जाते. त्यांना वाम मार्गाला लावले जात आहे. विज्ञानाच्या अविष्काराने सुखी व्हायचे तरीही अंधश्रद्धा जपायच्या, त्यातून तणाव निर्माण करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्यांचा खून करायचा अशी विघातक कृत्ये इतिहासात घडत होती आजही घडत आहेत. एकीकडे कुपोषणाने लहान मुले मरत आहेत. कर्जबाजारी होऊन शेतकरी आत्महत्या करीत आहे. अनेकांना पोटभर अन्न नाही, अंगभर वस्त्र नाही, राहण्यासाठी निवारा नाही. दुसरीकडे श्रद्धेच्या नावावर देवस्थानाची वाढणारी संपत्ती, पंचतारांकीत मठ, सुखासीन आयुष्य जगणारे बुवा, बापू त्यांना शिरोधार्य मानणारे धनाढ्य नागरिक हे सर्व आजच्या विज्ञानयुगात घडत आहे. वास्तविक पहाता जी श्रद्धा जोपासल्याने आपली मानसिक गुलामगिरी होते आपला प्रयत्नवाद संपून प्रारब्धवाद सुरु होतो, जी श्रद्धा कर्मापासून परावृत्त करते आणि स्वतः बरोबर समाजाच्या प्रगतीस हानीकारक ठरते अशा प्रकारची कोणतीही श्रद्धा अंधश्रद्धा ठरते.

समाजातील अंधश्रद्धा कशा दूर होतील, नवी निर्माण होणे कसे बंद होईल असा प्रश्न पडतो तेव्हा त्यासाठी प्रभावी माध्यम शोधण्याची आवश्यकता पडते. त्यावेळेस कामी पडते ते संतसाहित्य, विज्ञानवादी दृष्टीकोन आणि बुद्धीजीवी वर्ग. ज्या काळास समानता, छिकित्सा विद्रोह हे शब्दही ऐकण्यास मिळत नसतील अशा काळात चावीकांपासून सुरू झालेली ही परंपरा बुद्धाने जिवंत केली तुकारामाने चिरंजीव केलं गाडगेबाबा, तुकडोजी महाराजांच्या प्रात्यक्षिक कीर्तनाच्या रूपात लोकप्रिय झाली.

आज आपण या लोकसंताचा वारसा चालवीत आहोत काय ? आपल्या बुरसटलेल्या धारणांचीही साफसफाई करणार आहोत का? तसं झालं तरंच कर्मयोद्धा संताचे स्मरण करणं कालोचित ठरेल. अन्यथा ।।नर्मदेतला दगड शेवटी कोरडाच राहिला।। अस म्हणाव लागेल.

तशी वेळ न येऊ देता आपण संतविरांना प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प करू या.

**संदर्भ ग्रंथसुची**

१) पुन्हा तुकाराम - दि.पु. चित्रे

२) संत वाड्.मयाची सामाजिक फलश्रुती -डॉ. निर्मलकुमार फडकुले

३) तुकोबांचे व्यक्तित्व आणि कवित्व - डॉ. मनोज तायडे

४) कर्मयोगी संत गाडगेबाबा - प्रबोधनकार ठाकरे

❑ ❑ ❑



Scanned with CamScanner